मराठी चित्रसृष्टीतले प्रसिद्ध गीतकार व कवि श्री जगदिश खेबुडकर न चुकता दर वर्षी भाऊबीजेला कोल्हापुरला आपली बहीण सौ. लता कालेकरकडे जातात. काहीतरी भेटवस्तु दिल्याशिवाय अर्थातच ते रहात नाहीत. लता एकदा जगदिश खेबुडकरांना म्हणाली, " नाना, दरखेपेला असे काहीतरी घ्यायला आता मी काही लहान राहिले नाही. तू आपला दर खेपेला तुझी एखादी कविता मला भाऊबीजेची भेट म्हणून देत जा. ती अगदी मी माझ्या हृदयाशी जपून ठेवत जाईन." तेव्हापासून नाना आपल्या बहिणीला ज्या कविता ओवाळणीत घालू लागले त्यातील निवडक कविता लताकडून आम्हाला मिळाल्या. आजवर ह्या कोठेहि प्रसिद्ध झालेल्या नाहीत. त्या प्रसिद्ध करण्यास हरकत नसल्याचे त्यानी मला सांगितले. ह्या कविता रसिकांपुढे सादर करण्यास मला आनंद वाटतो. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या एखाद्या अधिवेशनात त्यांच्या **Lifetime Achievement** बाबत सत्कार होऊन त्याना मानाचा मुजरा मिळावा हे उचित वाटते.

अशोक बसर्गेकर
१४२३ नॉर्थ क्लीव्हलंड स्ट्रीट
ऑरेंज, कॅलिफोर्निया. ९२८६७.

## ओवाळणी

लाखमोलाची दिवाळी, दीपपूजेचा हा सण
किती सुख होतं दुणं, थोडं दुखः होतं उणं !

लाख मोलाची दिवाळी, लक्ष्मीपूजनाचा थाट
संचिताचं, सुकृताचं, माप भरे काठोकाठ

लाखमोलाची दिवाळी, प्रतिपदा की पाडवा
जिवाशिवाला कळावा, माया ब्रह्माचा गोडवा

लाखमोलाची दिवाळी, भाऊबीज साधीभोळी
आयुष्याच्या तबकांत, ज्योत ज्योतीला ओवाळी

लाखमोलाची दिवाळी, जशी येई तशी जाई
अंगणात, अंतरात, एक खूण मागे राही

नाना ( जगदिश खेबुडकर)
८/११/१९९१

---

## ओवाळणी

भाऊबीजेचं हे बीज
कुण्या देवानं पेरलं
युगायुगांच्या पिकाला
मोती कणस धरलं
तुझी सात्विक पुण्याई
तिला कर्तुत्वाची छाया
माझ्या आंधळ्या कीर्तीला
हवी डोळसांची माया !

जन्म गुणता गुणता
उणा पडलो अखेरी
माझ्या एकाकीपणाला
माझी प्रदक्षिणा फेरी

दिवा ज्योतीला बोलतो
तुझं माझं हे आकाश
अंधाराला ओरखडा
काढी दूरचा प्रकाश

आज नव्यानं करतो
पुन्हा जुन्याची पेरणी
काळजाच्या तबकांत
शब्द झाला ओवाळणी

नाना ( जगदिश खेबुडकर)
२५/१०/१९९५ रात्री ७ वा. गणपती पुळे

---

## ओवाळणी

अरं आभाळाच्या झाडा
माझी सावली चोरली
वात्सल्याची आठवण
दारी अंगणी पेरली

अरं आभाळाच्या झाडा
दिली ऐहिकाची फळं
उतरणीच्या रथाचा
घोडा दुडुदुडु पळं

अरं आभाळाच्या झाडा
माझा वेल विस्तारला
तुझ्या फांदीला विळखा
जन्म तोलून धरला

अरं आभाळाच्या झाडा
तुझं रूप मला यावं
बहिणीच्या अंगणांत
झाड होऊन रहावं

नाना ( जगदिश खेबुडकर)
१३/११/१९९६ सकाळी १०: ३० वाजता

---

## ओवाळणी

सुखवास्तुमधे, सुखवस्तु रहा, सुखरूप तुम्ही दोघे
परिवार उभा मागे.

तम दुरिताचा सरला हो
आनंद कलश भरला हो
पद लक्ष्मीचे अंगणि आले, मनि वेध जणू लागे !

तुम्हि अपार केले कष्ट
लागो न कुणाची दृष्ट
ममते संगे व्यवहाराचे, तुम्हि विणले हे धागे

संसार मंदिरी आता
नवज्योत समइची येता
तेजोमय या दीपावलिचे, सौभाग्य इथे जागे!

या चिन्मय शांतीसाठी
बसल्या या रेशिमगांठी
भवितव्य असे स्व- रूपात दिसे, अनुरूप तुम्हाजोगे!

ही भाऊबीज नित यावी
ओवाळणि अक्षय व्हावी
पंचारतिला शतजन्माचे वरदान हृदय मागे !

नाना ( जगदिश खेबुडकर)
१०/११/१९९९

---

## धागा

असे धाग्यात बांधले, भावाबहिणींचे नाते
रक्षाबंधनाचे गाणे, मन गाभाऱ्यात गाते

सारे मिळुनिया राहू, एकमेकाच्या पाठीशी
माया ममता रूपाने, पुण्य बांधुया गाठीशी

कोण कुणासाठी आहे, कोण कुणाला पुरला
जन्म दुःखाचा डोंगर, कुणी पेलुन धरला?

सुख शोधता शोधता, दुःख विरुनिया जाई
आनंदाच्या श्रावणात, डोळा भिजूनिया राही

तुम्हा साऱ्यांच्या सांगाती, भान हरपून जाते
असे धाग्यात बांधले, भावा बहिणींचे नाते!

नाना ( जगदिश खेबुडकर)
१२/६/२००३ रक्षाबंधन.

---

## भाऊबीज

दिवाळी नि भाऊबीज, जुळ्या बहिणी बहिणी
एक संसार सजवी, एक सात्विक गृहिणी

दिवाळीच्या अंगणात, भाऊबीज घाली सडा
एकमेका न्याहाळिता, कां ग पाणावल्या कडा?

भाऊबीजेचा देव्हारा, दिवाळीनं ग पूजला
डोळा आनंद टिपून, जरीपदर भिजला

दिवाळीच्या तबकात, भाऊबीज नीरांजन
ज्योत भेटली ज्योतीला, एक आत्मा देह दोन

भाऊबीजेपुढं भाऊ, डोळं मिटून बसला
ओघळता मोती तिनं, कुण्या मायेनं पुसला

ओवाळणी घालायाचं, गेलं विसरून भान
दामदुपटीची ठेव, बंधुप्रेमाचं हे दान!

दिशा ओठंगुन उभ्या, असा बघाया सोहळा
भाऊबीजेच्या साक्षीला, सारी सुखं झाली गोळा!

काय सांगू ही किमया, अशी देवाची करणी
दिवाळी नि भाऊबीज, जुळ्या बहिणी बहिणी!

नाना ( जगदिश खेबुडकर)
२६/१०/२००३ भाऊबीज.

---



जगदिश खेबुडकर आणि अशोक बसर्गेकर




वहिनी परांडेकर, सौ. खेबुडकर, जगदिश खेबुडकर, सौ. लता कालेकर,
मिस्टर कलेकर, आणि सौ. प्रीति बसर्गेकर




सौ. लता कालेकर, मिस्टर कालेकर, त्यांचा नातू आणि सौ. प्रीति. बसर्गेकर.